# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट १९९-२२** **दिनांक: ०२-०७-२२**

## सी.आय.डी ऑफीसर असल्याची बतावणी करुन फसवणुक करणा-या आरोपीला मुद्देमालासह अटक - नवघर गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

दिनांक २२/०६/२०२२ रोजी फिर्यादी श्री. मोहन सुरु शेट्टी, वय ५६ वर्षे हे त्यांचे मुळ जाण्यासाठी भाईंदर रेल्वे स्टेशन येथे रेल्वेचे रिझर्वेशन करुन परत घरी जात असताना एक अनोळखी इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, अंगाने मजबुत याने फिर्यादी यांना तो सी.आय.डी ऑफीसर आहे अशी बतावणी करुन फिर्यादी यांचे गळ्यातील चैन, हातातील आंगठी तसेच रोख रक्कम ८,९००/- रुपये असा एकुण १,१८,९००/- किंमतीचा मुद्देमाल फसवणुक करुन घेवुन गेला होता. सदरबाबत नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४७५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४२०, १७० प्रमाणे अनोळखी आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे तांत्रीक विश्लेषन करुन आरोपीत नामे मुन्नावर ऊर्फ अन्वर अब्दुल हमीद शेख, वय ४५ वर्षे, रा. सोनाजी घोसावलाच्या मागे, इब्राहीम आईची चाळ, कसाईवाडा, कुरेशीनगर, कुर्ला (प.) मुंबई यास नालासोपारा येथुन ताब्यात घेवुन दि.२७/०६/२०२२ रोजी अटक केली आहे. तसेच आरोपीकडुन फिर्यादी यांचे फसवणुक केलेल्या मुद्देमालापैकी १,१०,०००/- रु. किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे. अटक आरोपी हा फसवणुकीच्या गुन्हयांमध्ये सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द मुंबई, ठाणे, नवी मुंबई आयुक्तालयात तसेच पश्चिम बंगाल इ. ठिकाणी ४८ पेक्षा जास्त गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ.शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग, श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/सुशिलकुमार शिंदे (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजीत लांडे, पोहवा/भुषण पाटील, पोना/गणेश जावळे, पोशि/नवनाथ घुगे, सुरज घुनावत, ओमकार यादव, विनोद जाधव यांनी केलेली आहे.

---------------ooooo---------------